साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25

* परळी वैजनाथ * रविवार, दि. ३० नोव्हेंबर २०२५ * पाने-४ * २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

## पालिका निवडणुकीसाठी नेत्यांची शक्ती पणाला; चुरस वाढली

परळी वैजनाथ, (बातमीदार):- संपूर्ण बीड जिल्ह्याचे लक्ष लागलेल्या परळी नगरपालिकेच्या निवडणूक प्रचारात मंत्री, खासदार, आमदार उतरल्याने या निवडणुकीची चुरस वाढली असून नेते व उमेदवारांनी आपली प्रतिष्ठा पणाला लावली आहे.

मंगळवारी (दि.२) होणाऱ्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी आठ व नगरसेवकांच्या निवडणुकीसाठी सुमारे दीडशेवर उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (अजितपवार गट), शिवसेना (शिंदेगट) व इतर मित्र पक्षाची महायुती, काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी व माकप यांची संयुक्त आघाडी तर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्यात प्रामुख्याने येथे लढत होत आहे. शिवसेना (उबाठा) यांनीही काही जागेवर उमेदवार उभे केले आहेत. अपक्षही मोठ्या संख्येने निवडणूक रिंगणात आहेत. पालिकेवर सत्ता मिळविण्यासाठी या सर्व पक्षाच्या नेते व कार्यकर्त्यांनी आपली प्रतिष्ठा पणाला लावली आहे. घरोघर जावून थेट मतदारांच्या भेटी घेवून मोठमोठ्या प्रचार रॅल्या काढून शक्तीप्रदर्शन करत उमेदवार आपला प्रचार करत आहेत. ढोलताशाच्या गजरात, फटाक्याची आतषबाजी करत रॅल्या काढल्या जात आहेत. प्रचार रॅलीत खासदार बजरंगबप्पा सोनवणे, मंत्री पंकजाताई मुंडे, आमदार धनंजय मुंडे, राजश्रीताई मुंडे, शिवसेनेच्या ज्येष्ठ नेत्या सुषमा अंधारे असे मान्यवर प्रचारात उतरल्याने या निवडणुकीची परळीत चुरस वाढली आहे. या निवडणुकीचा प्रचार शेवटच्या टप्यात असून मतदारांचे मन आपल्या बाजुने वळवण्यासाठी उमेदवार जोरदार प्रयत्न करत आहेत. परळीत तिरंगी लढतीत बाजी कोण मारणार याकडे सर्वांचे लागले आहे. थेट जनतेतून होणाऱ्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी महायुतीच्या पद्मश्री धर्माधिकारी, काँग्रेस आघाडीच्या सय्यद मैमुना हनिफ उर्फ बहादूरभाई, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) च्या सौ.संध्या देशमुख यांच्यात प्रामुख्याने लढत होत आहे.

दरम्यान, येत्या मंगळवारी (दि.२) होणाऱ्या या निवडणुकीसाठी प्रशासन यंत्रणा सज्ज झाली आहे. शहरात या निवडणुकीसाठी एकूण ८८ मतदान केंद्र असून सुमारे ७९ हजार ५६९ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. सकाळी ७.३० वाजता मतदानास सुरूवात होणार असून सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदानाची वेळ असणार आहे. या निवडणुकीसाठी सुमारे पाचशेवर कर्मचारी यंत्रणेत असणार आहेत. मतदान प्रक्रिया शांततेत पार पडावी म्हणून मोठ्या प्रमाणात पोलिस तैनात करण्यात आले आहेत. बुधवारी (दि.३) या निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे. ***

## आशा वर्कर्स, अंगणवाडी सेविका व गटप्रवर्तकांच्या बैठकीत संपूर्ण ताकद महायुतीलाच देण्याचा निर्धार !

परळी वैजनाथ, (बातमीदार):- आ. धनंजय मुंडे यांचे नेतृत्व हे सर्वांसाठी काम करणारे नेतृत्व असून अविरतपणाने शहरातील सर्व घटकांचा विचार करून आवश्यक त्या सर्व बाबी करण्याचे काम धनंजय मुंडे यांनी केलेले आहे. हीच पद्धत येणाऱ्या काळात आपण परळीच्या विकासामध्ये अवलंबणार आहोत. शहरात काम करणाऱ्या अशा वर्कर्स अंगणवाडी सेविका व गटप्रवर्तकांच्या हितासाठी नगर परिषदेच्या माध्यमातून काही विशेष व वेगळे उपक्रम येणाऱ्या काळात आपण राबवणार असल्याची ग्वाही सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे यांनी दिली. तर महिला शक्तीचा सन्मान आणि कल्याणाची कामे करण्यासाठी आपण प्राधान्य देऊ अशी ग्वाही नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी दिली.

परळी वैजनाथ नगरपरिषद निवडणुकीत नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी व राष्ट्रवादी काँग्रेस व महायुतीच्या सर्व




प्रभागातील नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ शहरातील आशा वर्कर्स अंगणवाडी सेविका व गटप्रवर्तकांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत सौ.राजश्रीताई धनंजय मुंडे यांनी उपस्थित सर्व महिला भगिनींशी आत्मीय संवाद साधला. आशा वर्कर्स ,अंगणवाडी सेविका व गटप्रवर्तकांच्या हितासाठी आवश्यक त्या बाबींवर मनमोकळेपणाने चर्चा केली. त्याचबरोबर या महिलांच्या हितासाठी नगर परिषदेच्या माध्यमातून आपण जे जे करू शकतो त्या सर्व गोष्टी येणाऱ्या काळात करण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी सांगितले की, परळी नगर परिषदेत ना.पंकजाताई मुंडे व आ.धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली नवा दृष्टिकोन घेऊन विकासाची आपली संकल्पना असून मी स्वतः एक महिला नगराध्यक्ष म्हणून तुमच्या आशीर्वादावर काम करणार आहे. नगराध्यक्ष म्हणून मला व सर्व उमेदवारांना आपण भरभरून आपले आशीर्वाद पाठीशी उभे करावेत. महिलांचा सन्मान होईल असेच काम आम्ही करू असा शब्द त्यांनी यावेळी दिला. या बैठकीला आशा वर्कर्स, अंगणवाडी सेविका व गटप्रवर्तक महिला भगिनी प्रचंड संख्येने उपस्थित होत्या. सौ. राजश्रीताई वहिनींशी अतिशय मनमोकळेपणाने त्यांनी हितगुज केले व आपल्या समस्या मांडल्या. त्याचबरोबर आम्हा सर्व महिलांची संपूर्ण ताकद महायुतीच्या सर्व उमेदवारांच्या पाठीशी आम्ही उभी करणार असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.**

## काँग्रेस आघाडीच्या मैनुमा बेगम यांना अपक्ष नगराध्यक्षपदाच्या उमेदवार शेख हिना यांचा पाठिंबा

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी उभे असलेले अपक्ष उमेदवार शेख हिना फिरदोस शफीक यांनी काँग्रेस , माकप,वंचित बहुजन आघाडीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार मैनुमा बेगम सय्यद हनीफ उर्फ बहादूर भाई यांना आपला जाहीर पाठिंबा दिला आहे.शेख हिना यांच्या पाठींब्यामुळे परळी नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदी मैनुमा बेगम सय्यद हनीफ याच निवडून येणार हे निश्चित झाले आहे. त्यांचे स्वागत काल प्रभाग क्रमांक १६ मध्ये झालेल्या जाहीर कॉर्नर सभेत काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादुर भाई यांनी केले. यावेळी बोलताना वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे म्हणाले की ,या नगरपालिका निवडणुकीत आता जर परिवर्तन करावयाचे असेल तर शहरातील तमाम दलित, मुस्लिम आणि ओबीसींनी आघाडीच्या पाठीशी राहून नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारासह सर्वांनाच विजयी करण्याची गरज आहे. २८ रोजी सायंकाळी प्रभाग



क्रमांक १६ मध्ये काँग्रेस वंचित बहुजन आघाडीची भव्य कॉर्नर सभा पार पडली. या प्रचार सभेला काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादुर भाई, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे,वंचित बहुजन आघाडीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार मैनुमा बेगम सय्यद हनीफ उर्फ बहादुर भाई या प्रभागाचे नगरसेवक पदाचे उमेदवार जुनेद मुलानी, प्रभाग क्रमांक ५ चे उमेदवार बालासाहेब जगतकर, कांग्रेस शहराध्यक्ष बहादुर भाई, तालुका अध्यक्ष अँड.प्रकाश मुंडे, जेष्ठ नेते प्रकाश देशमुख, शशी चौधरी,एतेशाम खतीब,वंचित बहुजन आघाडी सचिव अँड.संजय रोडे, प्रसेनजित रोडे, राजेश सरवदे,प्रेम जगतकर,सय्यद समीर , धम्मानंद क्षीरसागर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी नगराध्यक्ष पदाचे अपक्ष म्हणून निवडणूक रिंगणात असलेल्या शेख हिना फिरदोस शफीक यांनी काँग्रेस वंचित बहुजन आघाडीवर विश्वास व्यक्त करीत तसेच परळी शहरात परिवर्तनाची गरज लक्षात घेऊन नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार मैनुमा बेगम सय्यद हनीफ यांना तसेच कांग्रेस वंचित बहुजन आघाडी, माकपच्या आघाडीला जाहीर पाठिंबा दिला.तसेच आघाडीच्या विजयासाठी पूर्ण ताकदीनिशी काम करणार असल्याचे जाहीर केले. पाठिंबा दिल्याबद्दल कांग्रेसचे शहराध्यक्ष बहादुर भाई यांनी शेख हिना फिरदोस शफीक यांचे स्वागत केले.या प्रचार सभेला नागरिकांची प्रचंड गर्दी होती.तसेच कांग्रेस, वंचित बहुजन आघाडी, माकपचे कार्यकर्ते उपस्थित होते. ***

## परळी वैजनाथ नगर परिषद निवडणूक २०२५

**नगराध्यक्ष पदाचे उमेदवार व चिन्ह**

१) नाझिया बेगम शमशुद्दीन खतीब - फुटबॉल
२) संध्या दीपकराव देशमुख - तुतारी वा.माणुस
३) पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी - घड्याळ
४) भाग्यश्री बालाजी पवार - कपाट
५) उषा प्रमोद मुळे - हत्ती
६) शेख सफिया बेगम इस्माईल - छत्री
७) शेख हिना फिरदोस्त शफिक - गॅस सिलेंडर
८) सय्यद मैमुना हनीफ उर्फ बहादुरभाई - हात

**नगरसेवक पदाचे उमेदवार**

*** प्रभाग क्रमांक एक-अ ***
वंदना आघाव - कमळ
नाजेमा बाजी - कपबशी
नादानबी खाजा शेख-तुतारी वा.माणुस

*** प्रभाग क्रमांक एक-ब ***
गुलाब पठाण - हात
दीपक मुंडे - घड्याळ
शेख नबी - तुतारी वा.माणुस

*** प्रभाग क्रमांक दोन-अ ***
मनोरमा आदोडे - तुतारी वा.माणुस
कविता इंगळे - घड्याळ
संगीता कोपनर - स्कूटर
सुनैना गायकवाड - एसी

*** प्रभाग क्रमांक दोन-ब ***
अल्ताफ खान - घड्याळ
वहाब खुरेशी - टीव्ही
अमीन शेख - कपबशी
जावेद शेख - तुतारी वा.माणुस
सय्यद हनीफ उर्फ बहादूरभाई - हात
त्रिरत्न सूर्यवंशी - बॅट

*** प्रभाग क्रमांक तीन-अ ***
मुस्तकीन कुरेशी - बॅट
सुलतानाबी कुरेशी - फलंदाज
अजीम शेख - घड्याळ
शेख खैरूनिसा बेगम युसूफ - कपबशी
सोहेल मुख्तार शेख - ऑटोरिक्षा
फारूक गणी - हात

*** प्रभाग क्रमांक तीन ब ***
जकीयाबी पठाण - घड्याळ
शेख आयेशा मोसीन - पतंग
शेख नसीमा बेगम - रोडरोलर
बिस्मिल्ला बेगम - हात
यास्मिन शेख - हेलिकॉप्टर
हुसेनाबी अमीन - स्कूटर
सय्यद रशिदाबी - सफरचंद
सय्यद हसीना सय्यद जब्बार - तुतारी वा.माणुस

*** प्रभाग क्रमांक चार अ ***
अशोक तरकसे - तुतारी वा.माणुस
भरत ताटे - ट्रॅक्टर
संदीप ताटे - कपबशी
नितीन रोडे - घड्याळ

*** प्रभाग क्रमांक चार ब ***
सोनल डोके - नारळ
शांता नाईकवाडे - कमळ
मीरा नागरगोजे - ऑटोरिक्षा
अनिता पांडे - तुतारी वा.माणुस
सोनी बुंदिले - छताचा पंखा
शेख परवीन बेगम - शिट्टी
इंदुबाई शिरसाठ - हात

*** प्रभाग क्रमांक पाच अ ***
सोनाली टाक - तुतारी वा.माणुस
जयश्री मोगरकर - कमळ

(उर्वरित पान २ वर)

# परळीत रोजगार निर्मिती आणि विकास हाच माझा अजेंडा-धनंजय मुंडे

परळी वैद्यनाथ (बातमीदार):-औष्णिक विद्युत केंद्रात मेगा सोलर प्रकल्प उभारणे, सिमेंट फॅक्टरी, शासकीय शिक्षण संस्था, वैद्यनाथ मंदिर पर्यटन अशा विविध माध्यमातून रोजगार निर्मिती करणे आणि शहराचा विकास करणे, हा आमचा अजेंडा आहे. जाती - धर्माचे राजकारण करणे मला कधीच जमले नाही, म्हणूनच परळीची जनता माझ्या पाठीशी आजवर खंबीर पणाने उभी राहिली आहे. आज नगर परिषद निवडणुकीत देखील मी विकासाचा अजेंडा घेऊन मत मागत आहे. पुन्हा इथली जनता कुणाच्याही बुद्धिभेदाला बळी न पडता विकासाच्या मागे उभी राहील, इथल्या मातीची आणि माणसांची सर्वत्र बदनामी करणाऱ्यांना मतातून उत्तर देईल, असा विश्वास माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी परळी शहरातील आझाद नगर येथील कॉर्नर सभेत बोलताना व्यक्त केला.

परळी नगर परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना (शिंदे गट), रिपाइं (आठवले गट) व मित्र पक्ष महायुतीच्या नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार सौ पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, प्रभाग ८ मधील अधिकृत उमेदवार महानंदा व्हावळे, शकील कुरेशी, प्रभाग ९ मधील उमेदवार कार्तिक कांबळे, खैसरबी



राजा खान यांच्या प्रचारार्थ शहरातील आझाद नगर येथे आयोजित कॉर्नर बैठकीस अक्षरशः जाहीर सभेचे स्वरूप

आले होते.

इथल्या लोकांच्या घरात पाणी किती वाजता येते, त्याची माहिती मला असते, कारण इथल्या प्रत्येक माणसाशी मी थेट जोडलेला आहे. इथल्या जनतेने मला हजारो मतांची आघाडी विधानसभेत दिली तशीच माझ्या प्रत्येक निवडणुकीत दिली. त्यामुळे त्यांची अखेरच्या श्वासापर्यंत सेवा करणे, हा माझा धर्म आहे, असेही धनंजय मुंडे म्हणाले. आगामी काळात विकासाची ग्वाही आणि जनतेचा विश्वास सार्थकी लावायचा शब्द देतो, असेही श्री. मुंडे म्हणाले. यावेळी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांचे प्रतिनिधी बाजीराव धर्माधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अय्युब भाई पठाण, डॉ. संतोष मुंडे, रिपाइंचे सचिन कागदे, जाफर खान, राजा खान, अजीज कच्छी, नाझर भाई, शकील कच्छी, भीमा पोळ, युनूस बेग, राहुल घोबाळे, अल्ताफ पठाण, अनंत इंगळे, रवी मुळे, महेबुब कुरेशी, माधवराव ताटे, जावेद कुरेशी, शरण मस्के प्रभाग क्र ८ मधील उमेदवार महानंदा व्हावळे, शकील कुरेशी, प्रभाग क्र ९ मधील उमेदवार कार्तिक कांबळे, खैसर राजा खान यांसह पदाधिकारी व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ***

# महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ सौ.राजश्रीताई धनंजय मुंडे मैदानात

## परळीकरांचे आमच्यावर प्रचंड प्रेम; केवळ विकास,विकास आणि विकासाच होणार- सौ.राजश्रीताई मुंडे

परळी वैजनाथ, (बातमीदार):- नगरपरिषद निवडणुकीत सकाळपासूनच सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे यांनी महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ विविध भागात प्रचार दौरा केला. या प्रचार दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद देत नागरिकांनी विशेषतः महिलांनी त्यांचे आत्मीय स्वागत करत ''वहिनी महायुतीच विजय होणार'' अशी खात्रीच राजश्रीवहिनी यांना दिली.आमच्यावर परळीकर जनतेचे प्रचंड प्रेम असून या प्रेमाला उतराई होण्यासाठी केवळ विकास आणि विकासच करू असा शब्द सौ. राजश्रीताई मुंडे यांनी यावेळी ठिकठिकाणी बोलताना दिला.

राष्ट्रवादी काँग्रेस व महायुतीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी व परळी शहरातील विविध प्रभागात महायुतीच्या वतीने



अधिकृत उमेदवारी देण्यात आलेल्या सर्व उमेदवारांच्या प्रचारासाठी सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे या स्वतः मैदानात उतरल्या असून आज पासून त्यांनी आपल्या प्रचार व जनसंपर्क दौऱ्याला सुरुवात केली. यामुळे परळीत प्रचंड चैतन्य निर्माण झाले आहे. आज शुक्रवारी सकाळी आठ वाजल्यापासून प्रभाग क्रमांक सहा मधून या दौऱ्याला सुरुवात झाली. यावेळी त्यांच्या समवेत नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ .पद्मश्रीताई धर्माधिकारी यांच्यासह या प्रभागातील उमेदवार बनसोडे अंजली केशवराव, शिंदे व्यंकटेश बाबुराव यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे यांची परळी शहरातील नागरिकांशी घट्ट नाळ जोडलेली असून त्यांचा मोठा जनसंपर्क आहे याची प्रचिती या दौऱ्यातही बघायला मिळाली. या आधीही त्यांनी लोकसभा, विधानसभा निवडणुकीत सक्रिय सहभाग घेत प्रचाराचा झंझावात निर्माण केला होता. त्याच पद्धतीने नगरपरिषदेवर महायुतीचा झेंडा फडकवण्यासाठीही सौ.राजश्रीताई धनंजय मुंडे स्वतः मैदानात उतरल्या आहेत.

यावेळी नागरिकांच्या गाठीभेटी घेत परळी नगर परिषदेत नगराध्यक्ष पदाला व सर्व नगरसेवक पदाला महायुतीच्या उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन केले. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, परळी वैजनाथ शहर महायुतीच्या बाजूने कायमच राहिले आहे. आमच्यावर लोकांनी प्रचंड प्रेम केलेले आहे. साहेब व ताई यांच्या बाजूनेच आजचेही वातावरण आहे. त्यामुळे येथे विकासावरच मतदान होईल.साहेबांवर लोकांचे प्रेम आहे कारण जसं साहेबांना कळतंय तसं साहेबांनी परळीचा विकास, विकास आणि विकासाच केलेला आहे. त्यामुळे या निवडणुकीत महायुतीचे नगराध्यक्षपदासह सर्वच्या सर्व उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून येतील. साहेब व ताई या दोघांच्या पाठीशी परळी नक्की आपल्या आशीर्वाद उभे करणार याची आपल्याला खात्री आहे. तमाम परळीकरांनी महायुतीच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी करावे, विकासाला आम्ही कुठेही कमी पडणार नाही अशी ग्वाही सौ .राजश्रीताई मुंडे यांनी यावेळी दिली. ***

# परळीकरांच्या सेवेत निरंतर काम करत आलो आहे; प्रामाणिकपणे काम करतच राहू-बाजीराव धर्माधिकारी

परळी वैजनाथ, (बातमीदार):- आमचे खंबीर नेतृत्व धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली गेले अनेक वर्षे प्रामाणिकपणाने आम्ही जनसेवेची कामे करत आलो आहोत. यापुढेही परळीचा चौफेर व सर्वांगीण विकास करण्याचे काम प्रामाणिकपणे करतच राहणार असल्याची ग्वाही माजी नगराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी यांनी दिली आहे.प्रभाग क्रमांक १२ मधील प्रचार पदयात्रेला प्रचंड प्रतिसाद मिळाला. या प्रभागातून महायुतीच्या सर्व उमेदवारांना सर्वाधिक मताधिक्य देण्याचा निर्धार नागरिकांनी व्यक्त केला.

राष्ट्रवादी व महायुतीच्या नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी व प्रभाग क्रमांक १२ अ मधील अधिकृत उमेदवार कराड प्राजक्ता श्रीकृष्ण व प्रभाग क्रमांक १२ ब चे उमेदवार मेनकुदळे योगेश विजयकुमार यांच्या प्रचारार्थ प्रचार दौरा काढण्यात आला. या प्रभागातील पदयात्रेला प्रचंड प्रतिसाद मिळाला. या प्रभागातील नागरिकांनी उस्फूर्त व आत्मियतेने स्वागत करत आमची शक्ती महायुतीच्याच पाठीशी असल्याची खात्री दिली. या प्रभागात ठिकठिकाणी जोरदार स्वागत झाले. बाजीराव भैया धर्माधिकारी व उमेदवार प्राजक्ता कराड ,योगेश मेनकुदळे, भाऊसाहेब कराड यांच्यासह या



प्रभागातील पदाधिकारी, महायुतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने या पदयात्रेत सहभागी झाले होते. या पदयात्रेत नागरिकांनी स्वयंपूर्ण सहभाग घेतला. महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचाराला उस्फूर्त प्रतिसाद देत एक प्रकारे या प्रभागातून महायुतीच्या नगराध्यक्षपदासह नगरसेवक पदाच्या उमेदवारांना सर्वाधिक मताधिक्य देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. या पदयात्रेला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता परळी नगरपरिषदेवर महायुतीचा झेंडा फडकणार यावर शिक्कामोर्तब झाले आहे.*



परळी वैजनाथ :- ना.पंकजाताई मुंडे यांनी महायुतीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी तसेच नगरसेवक पदाचे प्रभाग १० मधील उमेदवार सरोज डावरे, महेश मुंडे, कुसुमबाई चाटे यांच्या प्रचारार्थ कॉर्नर सभा घेतल्या.

# परळीच्या पद्मावती भागात धनंजय मुंडेंचा प्रचाराचा झंझावात

## पायी रॅलीला नागरिकांचा प्रतिसाद; घरोघर स्वागत



परळी वैद्यनाथ (बातमीदार):- परळी वैजनाथ शहरातील पद्मावती भागात महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ धनंजय मुंडे यांच्या प्रचाराचा झंजावात पहायला मिळाला. धनंजय मुंडे यांनी पायी रॅली द्वारे प्रभाग क्रमांक ७ मधील नागरिकांच्या भेटी घेत महायुतीच्या उमेदवारांना मतदान करण्याचे आवाहन केले. राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना (शिंदे गट), रिपाइं (आठवले गट) व मित्र पक्ष महायुतीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्यासह प्रभाग क्रमांक ७ मधील उमेदवार सौ. उषा किशोर केंद्रे तसेच सचिन रामनाथ सारडा यांना मतदान करण्याचे आवाहन श्री. मुंडे यांनी नागरिकांशी संवाद साधत केले.

दरम्यान धनंजय मुंडे यांच्या या रॅलीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पहायला मिळाला, अगदी घरोघर त्यांचे स्वागत - सत्कार करण्यात आले. विकासाच्या वाटेवर मार्गक्रमण करत असलेल्या परळी शहराला संपूर्ण विकसित करण्याचा आपला अजेंडा असून, यासाठी परळीकर नागरिक संपूर्ण ताकतीने आमच्या पाठीशी उभे राहतील, असा विश्वास यावेळी मुंडेंनी व्यक्त केला.

यावेळी जुगलकिशोर लोहिया, विजय भोईटे, शंकर आडेपवार, दीपक तांदळे, योगेश जाजू, दीपक कुलकर्णी, शाम तोष्णीवाल, उमेदवार सचिन सारडा, किशोर केंद्रे, नितीन आडेपवार, सचिन स्वामी, राम पेंतेवार, मयूर मुलजकर, ओंकार भोईटे, संतोष घोडके, सय्यद शेरू, राजू भाई, बापू गायकवाड, गंगाराम वाघमारे, शिवा होके, फिरोज भाई यांसह पदाधिकारी आदी उपस्थित होते. ***

# परळी नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या निमित्ताने नागरिकांना नम्र आवाहन




परळी नगरपरिषदेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली असून अनेक दावे प्रतिदावे, आरोप प्रत्यारोपांचे राजकारण जोरात रंगत आहे. या सर्व घडामोडींमध्ये एक गोष्ट मात्र स्पष्ट होते मी कोणालाही कधीही 'कठपुतली' किंवा 'बाहुली' असे म्हणाले नसतानाही, नगराध्यक्ष पदाच्या एका महिला उमेदवाराने स्वतःच मी रबरी स्टॅम्प नाही, कटपुतली नाही असे जाहीर सभेत सांगून स्वतःचीच फजिती करून घेतली. कारण ही चर्चा कोणी केलीच नव्हती. मग अचानक असे स्पष्टीकरण देण्याची आवश्यकता का भासली हा परळीकरांचा मोठा प्रश्न आहे.

या उमेदवारांचे आजवर राजकारणातले कर्तृत्व नेमके काय? कोणती लोकसेवा? कोणते प्रश्न सोडवले? कोणत्या पक्षकार्यामध्ये त्या कधी दिसल्या? केवळ नवरा नगराध्यक्ष होता म्हणून बायकोही नगराध्यक्षच झाली पाहिजे, हा अट्टहास का? पक्षाने त्यांच्या कामगिरीचे नेमके कोणते मूल्यमापन केले आणि कुठल्या योगदानाच्या आधारे त्यांना उमेदवारी देण्यात आली याचे उत्तर परळीकर शोधत आहेत.

सध्या गुळ असल्यामुळे मुंगळे जमतात तशी स्थिती परळीत आहे. जसजशी निवडणूक जवळ येईल, तसतसे काही लोक अमिषे, प्रलोभने, आकर्षक आश्वासने घेऊन येतील. तुला शासकीय योजनेतून घर मिळवून देतो व्यवसायासाठी कर्ज मिळवून देतो अशा गोडगोड गोष्टी सांगितल्या जातील. पण प्रश्न असा मागील

**चित्रा देशपांडे**
सामाजिक कार्यकर्त्या, परळी वै.

पाच-दहा वर्षांत या नेत्यांनी कोणाला खरंच मदत केली का? कोणाला घर मिळवून दिले का? एखाद्या तरुणाला व्यवसायासाठी आर्थिक योजना मिळवून देण्यासाठी धडपड केली का? परळीकरांनी या प्रश्नांची उत्तरे आपल्या मनात प्रामाणिकपणे शोधण्याची वेळ आता आली आहे. मोठे नेते येतील, भाषणे करतील, फोटो काढतील. त्यांच्या आडोशाला उभा राहून हा बनावट नम्र नेता स्वतःला खूपच साधा सोज्वळ दाखवेल. पण हा नम्र नसून नम्री आहे हे परळी शहरातील अनेक नागरिकांच्या अनुभवातून सिद्ध झाले आहे. निवडणूक संपली की हेच लोक गाडीची काचही खाली करत नाहीत, आपल्याला ओळखत नाहीत, आपली कामे तर लांबच; पण निवडणुकीच्या काळात मात्र अंगावर घेतात, गोड बोलतात, मन वळवण्याचा प्रयत्न करतात. म्हणूनच, या निवडणुकीत परळीकर नागरिकांनी जागरूक राहावे, भावनेला बळी पडू नये आणि खरी लोकसेवा करणाऱ्या, परळीच्या विकासासाठी सातत्याने उभे असणाऱ्या व्यक्तींनाच साथ द्यावी हेच माझे नम्र आवाहन. मतदारांनी जात-पात न पाहता नगराध्यक्ष पदाचा उमेदवार आपल्यासाठी किती लवकर उपलब्ध होऊ शकतो, कोणत्या पद्धतीने आपल्या प्रभागाचा विकास करू शकतो यासाठी अत्यंत विचारपूर्वक नगराध्यक्ष पदासाठी मतदान करावे. कारण नगराध्यक्ष पदाचा उमेदवार निवडताना आपण भावनेच्या भरात चुकून दुसऱ्या चिन्हावर बटन दाबले तर पाच वर्षे किंवा अधिक काळ पश्चाताप करावा लागणार आहे. विकासाचे व्हिजन नसणाऱ्या रबरी स्टॅम्प पेक्षा सर्वसामान्य जनतेमध्ये मिसळणारी महिला कधीही आपल्यासाठी जवळची असेल. आपला एक मत फक्त उमेदवार ठरवत नाही. परळीच्या भविष्यासोबत कोण प्रामाणिक राहील हेही ठरवतो. सर्वजण प्रचाराच्या सभेमध्ये म्हणतात मी उतणार नाही.... मातणार नाही वसा सोडणार नाही परंतु हे फक्त व्यासपीठावर बोलायचे असते नंतर हे सर्व प्रासंगिक बोलणे नगराध्यक्ष झाल्यावर विसरून जातात. ज्या महिला उमेदवार निवडणुकीच्या रिंगणामध्ये आहेत त्यांचे पती राज नगराध्यक्ष असताना त्यांनी सर्वसामान्य जनतेला कधी विचारले नाही केवळ उच्चस्तरीय नेत्यांमध्ये उठबस केली. नेत्यांना खुश केले. टक्केवारी किती मिळवली याचा हिशोब जनता या निवडणुकीमध्ये त्यांना विचारणार आहे.*

*** प्रभाग क्रमांक पाच ब ***
बालासाहेब जगतकर - कपबशी
सतीश देशमुख - तुतारी वा.माणुस
विद्या बुंदेले - इस्त्री
नितीन राजूरकर - नारळ
अशरफ सिकंदर सय्यद - अंगठी
वैजनाथ सोळंके - घड्याळ

*** प्रभाग क्रमांक सहा अ ***
सुमनबाई गीते - मशाल
मंदाकिनी जठार - तुतारी वा.माणुस
अंजली माळी - कमळ
सुलभा मोरे - हात

*** प्रभाग क्रमांक सहा ब ***
यशवंत अभंग - बोट
गोपाळ आंधळे - ऑटोरिक्षा
सोमेश्वर गीते - मशाल
पद्मराज गुट्टे - रोडरोलर
दीपक देशमुख - तुतारी वा.माणुस
दत्ता लोखंडे - पुस्तक
व्यंकटेश शिंदे - धनुष्यबाण

*** प्रभाग क्रमांक सात अ ***
अश्विनी केंद्रे - कपबशी
उषा केंद्रे - कमळ
प्रेमा योगेश नानवटे - शिवणयंत्र
राजमती राऊत - तुतारी वा.माणुस

*** प्रभाग क्रमांक सात ब ***
मंगेश देशमुख - स्कूटर
वैजनाथ धंमपलवार - तुतारी वा.माणुस
सुरेश नानवटे - शिट्टी
दस्तगीरलाल शेख - हात
सचिन सारडा - घड्याळ
जगन्नाथ साळुंखे - मशाल

*** प्रभाग क्रमांक आठ अ ***
लक्ष्मीबाई कसबे - तुतारी वा.माणुस
लक्ष्मीबाई गायकवाड - हात
अर्चना रोडे - कपबशी
महानंदा हावळे - घड्याळ

*** प्रभाग क्रमांक ८ ब ***
माज रफिक कच्छी - तुतारी वा.माणुस
शकील कुरेशी - घड्याळ
अनंत गायकवाड - हत्ती
आमिर खान पठाण - कॅमेरा
इस्माईल मौला शेख - ट्रक
सय्यद साजिद - हात

*** प्रभाग क्रमांक ९ अ ***
कार्तिक कांबळे - घड्याळ
प्रवीण गायकवाड - हेलिकॉप्टर
गौतम साळवे - कपबशी
संपत हजारे - तुतारी वा.माणुस

*** प्रभाग क्रमांक ९ ब ***
सलीमाबी आबेद खान - तुतारी वा.माणुस
सविता नंदगवळी - नारळ
खैसर राजा खान - घड्याळ
रेहाना बाबू मिया शेख - हात

*** प्रभाग क्रमांक दहा १० अ ***
सुरेखा झिंजुर्डे - तुतारी वा.माणुस
सरोजा डावरे - घड्याळ
अंजली क्षीरसागर - कपबशी

*** प्रभाग क्रमांक दहा ब ***
अजय नागरगोजे - शिट्टी
महेश मुंडे - घड्याळ
मोहन मुंडे - तुतारी वा.माणुस
लक्ष्मण मुरकुटे - सफरचंद

*** प्रभाग क्रमांक दहा क ***
स्वाती आटकोरे - बॅट
भाग्यश्री गंगणे - तुतारी वा.माणुस
कुसुम चाटे - कमळ

*** प्रभाग क्रमांक ११ ***
कल्पना कांबळे - कपबशी
महादेव रोडे - घड्याळ
राजरत्न सरवदे - तुतारी वा.माणुस

*** प्रभाग क्रमांक ११ ***
गीते राजश्री रवींद्र - शिवसेना

*** प्रभाग क्रमांक १२ अ ***
प्राजक्ता कराड - घड्याळ
मंगल सोळंके - तुतारी वा.माणुस

*** प्रभाग क्रमांक बारा ब ***
आबासाहेब देशमुख - तुतारी वा.माणुस
योगेश मेनकुदळे - कमळ

*** प्रभाग क्रमांक १३ ***
रेश्मा बळवंत - राष्ट्रवादी कॉंग्रेस

*** प्रभाग क्रमांक १३ ब ***
दुर्गाबाई घाडगे - कपबशी
गायत्री पालीवाल - मशाल
मंदाकिनी मुंडे - हात
शिल्पा लाहोटी - घड्याळ

*** प्रभाग क्रमांक १४ ***
वैजनाथ कळसकर - तुतारी वा.माणुस
रवी (कान्हा) फड - कपबशी
पवनकुमार मुंडे - कमळ

*** प्रभाग क्रमांक १४ ब ***
पल्लवी कोरे - तुतारी वा.माणुस
सीमा ठाकूर - बॅट
डॉ.पूजा तोतला - कमळ
कल्याणी रामदासी - धनुष्यबाण
पूजा शेंद्रे - ऑटोरिक्षा
प्रतिभा सावजी - चावी

*** प्रभाग क्रमांक १५ ***
योगेश कांबळे - टीव्ही
अजय चौधरी - शिट्टी
प्रतिक्षा देशमुख - घड्याळ
डॉ.शाहेद मुजावर - हात
मैजन तबस्सुम - जग
शारेख शफीक - तुतारी वा.माणुस

*** प्रभाग क्रमांक १५ ब ***
सीमा देशमुख - तुतारी वा.माणुस
अस्मत शाखेर शेख - कपबशी
आफरीन बेगम - घड्याळ
शेख आशिया - पतंग
खाजाबी इस्माईल शेख - शिवणयंत्र
सय्यद फर्जाना बेगम - ट्रक
सय्यद सुलताना बेगम - रोडरोलर

*** प्रभाग क्रमांक १६ अ ***
कुरेशी आरेफा बेगम - तुतारी वा.माणुस
रूपाली महेश बागवाले - कपबशी
सारिका हरंगुळे - घड्याळ

*** प्रभाग क्रमांक १६ ब ***
तखी खान - घड्याळ
मुख्तार खान - बादली
राजाभैय्या पांडे - धनुष्यबाण
नितीन बागवाले - तुतारी वा.माणुस
जुनेद मुक्तार - हात

*** प्रभाग क्रमांक १७ अ ***
शोभा देवकर - हात
रूपाली पवार - घड्याळ
शेख सुरय्या - तुतारी वा.माणुस
सुवर्णमाला क्षीरसागर - कपबशी

*** प्रभाग क्रमांक १७ ब ***
पठाण रसूल खान - हात
राजेसाहेब विभुते - मशाल
शेख हाजी बाबू - घड्याळ
नदीम मुसा शेख - फुटबॉल
निसार शेख - तुतारी वा.माणुस
शेख शरीफ - ऑटोरिक्षा

# जंप रोप स्पर्धेत नवीन प्राथमिक शाळेची सानिया शेख बीड जिल्ह्यातून पहिली

परळी वैजनाथ, (बातमीदार):- अंबाजोगाई येथे नुकत्याच झालेल्या बीड जिल्हा पातळीवरील जंप रोप स्पर्धेत येथील उर्जानगर वसाहतीतील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या नवीन प्राथमिक शाळेतील इयत्ता चौथीत शिकणारी सानिया सुजात शेख ही विद्यार्थीनी पहिली आली आहे.

अंबाजोगाईच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात या स्पर्धा नुकत्याच पार पडल्या. स्पर्धेत शोफिया शेख ही दुसरी तर महेक शेख हा तिसरा आला. बीड जिल्हा जंप रोप असोसिएशनच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन केले होते. असोसिएशनचे पिराजी कुसळे, वैष्णवी जाधव, मनिष गोरे, अंकुश गायकवाड आदी



पदाधिकाऱ्यांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना मेडल व प्रशस्तीपत्र देण्यात आले. या स्पर्धेत बीड जिल्ह्यातून पहिला क्रमांक मिळविल्याबद्दल नवीन प्राथमिक शाळेत सानिया शेख हिचा सत्कार करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ शिक्षिका सौ. आर.पी. निटुरे, सौ.आयोध्या राऊत, सौ.शुभांगी मुंडे, पर्यवेक्षक एल.आय.वाकडे यांच्यासह शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, सानिया शेख हिच्या यशाबद्दल शालेय समितीचे अध्यक्ष नानासाहेब सोळंके, सर्व सदस्य तसेच मुख्याध्यापक डी.जी.शिंदे, पर्यवेक्षक उमेश देशमुख, क्रीडा विभाग प्रमुख भागवत मुंडे, विनोद देशमुख व शिक्षकवृंदांनी अभिनंदन केले आहे. ***

'परळी परिसर' हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com
* वर्ष ०९ * अंक ३० * पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) रविवार, दि. ३० नोव्हेंबर २०२५ * किंमत : २ रु.

# परळी नगरपालिका निवडणुकीत काँग्रेस व वंचित आघाडीस माकप चा पाठिंबा

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी नगर परिषद निवडणुकीत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा काँग्रेस व वंचित आघाडीच्या नगराध्यक्ष व नगरसेवक पदाच्या उमेदवास पाठिंबा जाहीर करण्यात आला आहे.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या जिल्हा कमिटीच्या सचिव मंडळ सदस्यांची बैठक नुकतीच झाली. त्यात परळी नगर परिषद निवडणुकी बाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. माकप भाजप सोबत असलेल्या महायुतीतील पक्षांच्या कायम विरोधात राहीलेला आहे. त्यामुळे परळी नगर परिषद निवडणुकीत काँग्रेस व वंचित आघाडी च्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सय्यद मैमुना हनिफ करीम यांना पाठिंबा जाहीर केला आहे. तसेच नगरसेवक पदासाठी काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवास पाठींबा देण्यात आला आहे. ज्या प्रभागात नगरसेवक पदासाठी काँग्रेस व वंचित आघाडी चा उमेदवार नसेल तेथे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या उमेदवारास पाठींबा देण्यात आला आहे. बैठकीला माकपचे जिल्हा सचिव कॉ अजय बुरांडे, कॉ पी एस घाडगे, कॉ पांडुरंग राठोड, कॉ दत्ता डाके, कॉ बब्रुवान पोटभरे, कॉ अशोक थोरात, कॉ बळीराम भुंबे, कॉ रोहिदास जाधव यांची उपस्थिती होती. जिल्हा सचिव मंडळ सदस्यांच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे परळी नगर परिषद निवडणुकीत माकपचा पाठिंबा असल्याचे निवेदन पक्षाचे तालुका सचिव कॉ गंगाधर पोटभरे यांनी केले आहे. परळी शहरातील नागरिकांनी काँग्रेस व वंचित आघाडी च्या उमेदवारास बहुमताने निवडून द्यावे असे आवाहन माकप च्या वतीने करण्यात आले आहे. ***

# स्वच्छ परळी, सुंदर परळी, निर्भय परळीसाठी काँग्रेस, वंचित बहुजन आघाडीला साथ द्या-बहादूरभाई

परळी (बातमीदार):- स्वच्छ परळी ,सुंदर परळी, निर्भय परळीसाठी परळी नगरपालिकेच्या २ डिसेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकीत काँग्रेस, वंचित बहुजन आघाडीला मतदान रूपी आशीर्वाद देऊन साथ द्या असे आवाहन काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादुर भाई यांनी केले तर परळी शहराचे वैभव असणारी आणि ऐतिहासिक व धार्मिक दृष्ट्या महत्त्वाची असणारी सरस्वती नदीचे वाटोळ करणाऱ्यांना अजिबात मतदान करू नका शहरातील या ऐतिहासिक नदीचे पुनर्जीवन करण्यासाठी आणि सोशोभीकरण करण्यासाठी काँग्रेस, वंचित बहुजन आघाडीच्या नगराध्यक्ष पदाचे उमेदवार मैनुमा बेगम सय्यद हनीफ उर्फ बहादूर भाई, तसेच प्रभाग क्रमांक २ व शहरातील आघाडीच्या सर्व नगरसेवक पदाच्या उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन काँग्रेसचे तालुकाध्यक्ष एडवोकेट प्रकाश मुंडे यांनी केले .ते प्रभाग क्रमांक २ मधील बरकतनगर मध्ये आयोजित करण्यात आलेल्या कॉर्नर सभेत



बोलत होते.

पुढे बोलताना बहादूर भाई म्हणाले की,परळी नगर परिषदेचत काँग्रेस वंचित बहुजन आघाडीची सत्ता आल्यानंतर प्रत्येक मोहल्यात, वस्तीत आरोग्याची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी मोहल्ला क्लिनिक सुरू करु, गुत्तेदार मुक्त नगर परिषद करु व शहराच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष देऊ.तर अँड.प्रकाश मुंडे म्हणाले की, परळीच्या मध्यभागातून सरस्वती नदी वाहत आहे. या नदीला ऐतिहासिक ,धार्मिक व पौराणिक संदर्भ आहे. परंतु भ्रष्टाचार आणि पैसे कमविण्यासाठी या ऐतिहासिक नदीचे विद्रुपीकरण करण्यात आले. गरज नसताना सरस्वती नदीवर शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधून नदीचे पात्र कमी करण्यात आले. यामुळे नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे नागरिकांच्या घरात पुराचे पाणी गेल्याने अनेक नागरिकांचे अतोनात नुकसान झाले .याला जबाबदार ही सत्ताधारी मंडळी होती. यावेळी उपस्थित मान्यवरांनी काँग्रेस वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले.

या प्रचार सभेला नगराध्यक्ष पदाचे उमेदवार मैनुमा बेगम सय्यद हनीफ उर्फ बहादूर भाई,एतेशाम खतीब, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे, जिल्हा सचिव अडवोकेट संजय रोडे ,प्रसेंजित रोडे, प्रभाग चार चे उमेदवार संदीप ताटे, प्रभाग चार ब उमेदवार इंदुबाई सिरसाट, ५ चे उमेदवार बालासाहेब जगतकर, प्रेम जगतकर ,दीपक शिरसाट यांच्यासह काँग्रेस ,वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते, महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. ***

# काँग्रेस, वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ प्रभाग क्र.१५ मध्ये भव्य प्रचारफेरी संपन्न



परळी (बातमीदार):- परळी नगरपरिषद निवडणूक काँग्रेस वंचित बहुजन आघाडीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार मैनुमा बेगम सय्यद हनीफ उर्फ बहादूर भाई तसेच प्रभाग क्रमांक १५ मधील उमेदवारांच्या प्रचारार्थ भव्य प्रचार फेरी काढण्यात आली. प्रचार फेरीस मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

प्रभाग क्रमांक १५ अ मधील वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार अस्मत शेख तसेच ब मधून उभे असलेले काँग्रेसचे उमेदवार शाहिद मुजावर व नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार मैनुमा बेगम सय्यद हनीफ उर्फ बहादूर भाई यांच्या प्रचारार्थ भव्य रॅली संपन्न झाली. या रॅलीमध्ये प्रभागातील प्रत्येक घरी भेट देऊन परळी नगर परिषदेमध्ये काँग्रेस वंचित बहुजन आघाडीची सत्ता हाती देण्यासाठी मतदारांशी संवाद साधला. प्रत्येक ठिकाणी मतदारांनी दोन्ही उमेदवारांचे जोरदार स्वागत केले. या प्रचार फेरीत काँग्रेस तसेच वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते ,महिला, पुरुष, मतदार बंधू, भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. परळी शहरात काढण्यात येणार या प्रत्येक प्रभागातील काँग्रेस, वंचित बहुजन आघाडीच्या प्रचार फेरींना जनतेचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे परळी नगर परिषदेवर काँग्रेस वंचित सत्ता येणार असे जनता बोलून दाखवत आहे. ***

# राजश्रीताई परळीची लुट होत असतांना लक्ष दिले असते तर परळीचा विकास झाला असता-मैनुमा बेगम

परळी वैजनाथ, (बातमीदार):- जेंव्हा परळीची लुट होत होती तेंव्हा लक्ष दिले असते तर नक्कीच परळी शहराचा चांगला विकास झाला असता व प्रचारात तुम्हाला महायुतीसाठी मतदान मागावे लागले नसते असे परखड मत कांग्रेस वंचित बहुजन आघाडीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार मैनुमा बेगम सय्यद हनीफ उर्फ बहादूर भाई यांनी व्यक्त केले आहे.आता परळीची जनता परिवर्तनासाठी उत्सुक असून काँग्रेस ,वंचित बहुजन आघाडीच्या पाठीशी उभी आहे असे प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

याबाबत नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार मैनुमा बेगम सय्यद हनीफ यांनी पुढे म्हटले आहे की,परळी नगर परिषदेचा अनागोंदी कारभार सुरू होता.सत्ताधारी कोणालाही न जुमानता मनमानीपणे कारभार करीत होते.शहरात नगरोत्थान



योजनेअंतर्गत ११० कोटी रुपये अंडरग्राऊंड नाल्या व रस्ते, भुयारी गटार योजना यासाठी आले होते. पण या योजनेचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झालेले आहे.एकाही गल्लीतील रस्ता चांगला झालेला नाही.उलट चांगल्या रस्त्यांचे वाटोळे केले आहे.खड्यात रस्ता की रस्त्यावर खड्डे हे कळत नाही.

ताई, परळीत अनेक महिलांवर अन्याय, अत्याचाराच्या घटना घडल्या तेंव्हा कांग्रेस पक्षाने या विरोधात न्यायासाठी आवाज उठविला.शहरात वाढलेली दहशत आणि गुंडगिरी यामुळे जनता भयभीत झालेली आहे.असा शहरातील भ्रष्टाचार आणि दहशत व दडपशाही सुरू असतांना परळीकरांसाठी तुम्ही पुढे यायला पाहिजे होते.परंतू अशाच लोकांना ताकद देण्यासाठी तुम्ही मतदान करा म्हणून शहरात फिरत आहात.प्रचार करीत आहात. परंतु परळीतील सुज्ञ मतदार बंधू ,भगिनी आता या गुंडगिरी आणि दहशतीला तसेच नगर परिषदेतील भ्रष्ट सत्ताधारी यांना कंटाळलेले असून २ डिसेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकीत कॉंग्रेस, वंचित बहुजन आघाडीलाच प्रचंड मतांनी विजयी करतील असेही मैनुमा बेगम सय्यद हनीफ यांनी म्हटले आहे. **

# मागील दहा वर्षांच्या सत्तेला परळीची जनता कंटाळली, काँग्रेस गतवैभव प्राप्त करून देईल - मैनुमा बेगम

परळी वैजनाथ, (बातमीदार):- मागील दहा वर्षांपासून परळीच्या नगर परिषदेवर सत्तेवर असलेल्या सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस व त्यांना साथ देणा-या भाजपा महायुतीला परळी वैजनाथ शहराची जनता कंटाळली असून काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीला विजयी केल्यास परळीला गतवैभव प्राप्त करून देऊ असे आश्वासन नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार मैनुमा बेगम सय्यद हनीफ उर्फ बहादूर भाई यांनी केले.त्या नगर पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १४ मध्ये काढण्यात आलेल्या प्रचार फेरीत मतदारांशी संवाद साधताना बोलत होत्या. मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या नंतर त्या म्हणाल्या की,माजी मंत्री व विद्यमान आमदार धनंजय मुंडे यांच्या ताब्यात असलेल्या परळी नगर परिषदेचा अनागोंदी कारभार परळीकरांनी पाहिलेला आहे.शहरातील जनता सर्व पहात होती.आता निवडणुकीत आलेली संधी सोडू नका व कांग्रेस व वंचित बहुजन आघाडीचे नगराध्यक्ष व नगरसेवक पदाचे सर्व उमेदवार विजयी करा असे आवाहन केले. प्रभाग क्रमांक १४ मध्ये काढण्यात आलेल्या प्रचार फेरीत या वेळी सौ.मंगला रोडे,सौ. चाटे मॅडम ,सौ ताटे ,कापसे ताई, सृष्टी रोडे,फिरदोस बेगम,शरफना बेगम यांच्यासह काँग्रेस वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते, महिला, पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.मैनुमा बेगम सय्यद हनीफ उर्फ बहादूर भाई यांच्या प्रचार फेरीस परळीत जोरदार प्रतिसाद मिळत आहे. ***

# बहादुरभाई सर्व धर्मीयांना सोबत घेऊन काम करणारे नेतृत्व त्यामुळे नगराध्यक्षाची संधी मैनुमा बेगम यांनाच द्या-मिलिंद घाडगे

परळी (बातमीदार):- काँग्रेसचे परळी शहर अध्यक्ष बहादूर भाई हे सर्व धर्मियांना सोबत घेऊन काम करणारे नेतृत्व आहेत.त्यामुळे परळी नगर परिषद निवडणुकीत नगराध्यक्ष पदाच्या कांग्रेस, वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार मैनुमा बेगम सय्यद हनीफ उर्फ बहादूर भाई यानांच प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव



मिलिंद घाडगे यांनी केले.ते प्रभाग क्रमांक १२ मध्ये नगराध्यक्षांच्या प्रचारासाठी काढण्यात आलेल्या प्रचार फेरीत बोलत होते.

वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा सचिव एडवोकेट संजय रोडे व युवा नेते सय्यद समीर यांच्या उपस्थितीत प्रभाग क्रमांक १२ मध्ये दिनांक २५ रोजी सकाळी भव्य प्रचार फेरी काढण्यात आली.विद्यानगर, कंडक्टर कालनी, सोमेश्वर नगर,नाथ नगर, शास्त्री नगर, गजानन महाराज मंदिर परिसर,इरिगेशन कालनी आदी भागातील मतदारांशी यावेळी संवाद साधला व कांग्रेस, वंचित बहुजन आघाडीला विजयी करण्याचे आवाहन केले. या प्रचार फेरीत कांग्रेस राज्य कार्यकारिणी सदस्य एडव्होकेट अनिल मुंडे, तालुकाध्यक्ष अडवोकेट प्रकाश मुंडे, जेष्ठ नेते प्रकाश देशमुख, सुभाष देशमुख, वंचितचे नेते प्रसेनजित रोडे, वंचित युवा तालुका अध्यक्ष राजेश सरवदे,वैजनाथ गडेकर, ख्वाजा शेख, महेश वाकडे, ऋषी लोमटे, इतेशाम खतीब आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. ***